0 3 DEC 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वनस्पतीशास्त्र विभागास कर्करोगावरील पेटंट

## शिवाजी विद्यापीठातील डॉ. गायकवाड, संशोधक विद्यार्थ्यांना यश : स्तनाचा कॅन्सर बरा होण्यास औषध उपयोगी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र अधिविभागातील डॉ. डी. के. गायकवाड आणि त्यांच्या संशोधक विद्यार्थ्यांनी 'डिवाइस टु डिस्पेंस ब्रेस्ट कॅन्सर मेडिकेशन' या विषयावर संशोधन केले आहे. 'लक्ष्मितरु (सीमारुबा ग्लोऊका)' या वनस्पतीचा अर्क वापरून ब्रेस्ट कॅन्सर (स्तनाचा कॅन्सर) उपचारासंबंधीचे औषध तयार केले आहे. या संशोधनाला पेटंट मिळावे म्हणून शिवाजी विद्यापीठाने भारतीय पेटंट कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला होता. प्रस्तावाला सरकारने मान्यता देत पेटंट जाहीर केले. त्यामुळे संशोधकांसह शिवाजी विद्यापीठाच्या यशात आणखी एक मानाचा तुरा खोवला.

### सर्वसामान्यांना कमी खर्चात उपचार



कॅन्सरच्या उपचारांमध्ये केमोथेरपी हा एकच पर्याय असून तो खूपच खर्चिक आहे. काही वेळा डॉक्टर ब्रेस्ट (स्तन) काढून टाकण्याचा सल्ला देतात. या उपकरणामुळे व औषधाच्या माध्यमातून कमी खर्चात एक पर्याय मिळणार आहे. हे संशोधन शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र अधिविभागात २०१७ पासून सुरू होते. इतर कर्करोगासाठी ऑस्ट्रेलिया सरकारकडे पेटंटसाठी प्रस्ताव पाठवला आहे.

**– डॉ. डी. के. गायकवाड (वनस्पतीशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ)**

डॉ. डी. के. गायकवाड आणि डॉ. चिराग नारायणकार, डॉ. निवास देसाई, डॉ. मानसी पाटील, डॉ. नवनाथ पिसे, डॉ. इंद्रजीत सामंत, सुदर्शन चरापले, सुप्रिया चौगुले आणि अंकिता कोळेकर या संशोधक विद्यार्थ्यांनी औषध आणि उपकरण तयार केले आहे. हे उपकरण कर्करोगामुळे बाधित पेशींचा शोध घेऊन, ब्रेस्ट कॅन्सर (स्तनाचा कॅन्सर) कोणत्या पेशीपर्यंत पोहचला याची माहिती देते. भविष्यात या प्रणाली बरोबर 'लक्ष्मितरु (सीमारुबा ग्लोऊका)' या वनस्पतीचा अर्क वापरून कर्करोगाचे निदान आणि उपचार करता येतील. 'लक्ष्मितरू'पासून बनवलेले औषध पूर्णपणे नैसर्गिक आहे. प्राचीन काळापासून विविध रोगांवर उपचारासाठी या वनस्पतीचा वापर केला जात आहे. लक्ष्मितरू या वनस्पतीच्या प्रत्येक भागात औषधी गुणधर्म आहे. या वनस्पतीची पाने व पानांचा अर्क नैसर्गिक प्रतिबंधात्मक क्षमता वाढविण्यासाठी केला जातो. आधुनिक कर्करोगावर उपचार करण्यासाठी ते वापरले जाणार आहे. यामध्ये जिवाणू रोधक आणि अँटिट्यूमरस गुणधर्म असल्याने कर्करोगाच्या रुग्णांमध्ये ट्यूमर कमी करण्यासाठी लक्ष्मितरू प्रभावी ठरते. हे औषध स्तनावरील कर्करोग बाधित क्षेत्र स्कॅन करू शकते.

संशोधकांनी औषधाबरोबर उपकरणही बनवले आहे. त्यामुळे हे उपकरणाच्या तळाशी सुईसारखी असणारी रचना कर्करोग बाधित क्षेत्रापर्यंत औषध पोचवण्यासाठी मदत करते. त्यामुळे हे औषध कर्करोगाच्या वाढीस प्रतिबंध करते. या संशोधनासाठी व पेटंटसाठी माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि विद्यमान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

03 DEC 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'लक्ष्मीतरू'ने कर्करोगाचे निदान

## शिवाजी विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र विभागाचे संशोधन

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक आणि संशोधक विद्यार्थ्यांनी 'डिवाइस टू डिस्पेंस ब्रेस्ट कॅन्सर मेडिकेशन' या विषयावरील प्रणालीच्या संशोधनाचे पेटंट मिळाले. लक्ष्मीतरू (सीमारुबा ग्लोऊका) या वनस्पतीचा अर्क वापरून ब्रेस्ट कॅन्सरवरील (कर्करोग) उपचारासंबंधीच्या औषधांसंदर्भातील हे संशोधन आहे.

वनस्पतिशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. डी. के. गायकवाड आणि संशोधक विद्यार्थी डॉ. चिराग नारायणकार, निवास देसाई, मानसी पाटील, नवनाथ पिसे, इंद्रजीत सामंत, सुदर्शन चरापले, सुप्रिया चौगुले आणि अंकिता कोळेकर यांनी हे संशोधन केले आहे. डिवाइस टु डिस्पेंस ब्रेस्ट कॅन्सर मेडिकेशन ही एक प्रणाली आहे. यामधील डिवाइस कर्करोगामुळे बाधीत पेशींचा शोध घेऊन औषध ब्रेस्ट कॅन्सर बाधीत कोणत्या पेशी पर्यंत पोहचले याबाबतची माहिती देते. याबाबतचे संशोधन सन २०१७ पासून अधिविभागामध्ये सुरू होते. भविष्यात या प्रणाली बरोबर 'लक्ष्मीतरू' या वनस्पतीचा अर्क वापरून कर्करोगाचे निदान आणि उपचार करता येणार आहे. याबाबतच्या पेटंटसाठी भारतीय पेटंट कार्यालयाकडे नोंद करण्यात आली होती. पेटंट मिळाल्याची माहिती आम्हाला गेल्या आठवड्यात मिळाली. आता ऑस्ट्रेलियन पेटंटसाठी अर्ज केला असल्याचे डॉ. गायकवाड यांनी गुरूवारी सांगितले.

### डिवाईस असे

'डिवाइस टु डिस्पेंस ब्रेस्ट कॅन्सर मेडिकेशन' अंतर्गत बॉडी स्कॅनरमध्ये छोटे-छोटे स्कॅनर बसविले आहेत. त्यामध्ये लक्ष्मीतरु वनस्पतीद्वारे तयार केलेले औषध लहान इंजेक्शनच्या माध्यमातून कर्करोगाने बाधीत पेशींना देण्याची प्रणाली विकसित केली आहे. लक्ष्मीतरु ही वनस्पती शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील बॉटनिकल गार्डन, सांगली जिल्ह्यातील जतमध्ये आणि बंगलुरुमध्ये आढळते, असे डॉ. गायकवाड यांनी सांगितले.

लोकमत

# तीस दिवसांत लागला ७३९ परीक्षांचा निकाल

संतोष मिठारी,
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोरोनाचा प्रादुर्भाव असतानाही नियोजन, पाठपुरावा आणि तांत्रिक अडचणी सोडवून शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विविध ७३९ परीक्षांचा निकाल तीस दिवसांत ऑनलाईन जाहीर केला. त्यामुळे वेळेत निकाल लावण्याची परंपरा विद्यापीठाने यावर्षीही जपली.



## विद्यार्थ्यांना दिलासा

अंतिम वर्षाचा निकाल लागल्यानंतर पुढे नोकरी, रोजगार मिळविणे अथवा उच्चशिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी प्रयत्न करतात. परीक्षेचा वेळेत निकाल लागल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला. यावर्षी उन्हाळी सत्रात बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी, आदी विविध अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

**उन्हाळी सत्र**

**७३९**
झालेल्या परीक्षा

**२,२०,०००**
परीक्षार्थी

**हिवाळी सत्र**

**६६४**
होणाऱ्या परीक्षा

**२,००,०००**
परीक्षार्थी

## ऑफलाईन परीक्षा

- ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील सत्रात कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेतील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या एकूण ६६४ परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेण्याचे नियोजन आहे.
- या परीक्षांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया दि. १२ नोव्हेंबरपासून सुरु झाली असून, अंतिम मुदत दि. ७ डिसेंबरपर्यंत आहे.

कोरोनाच्या स्थितीत परीक्षा घेण्याचे आव्हान होते. मात्र, अधिकार मंडळाच्या सूचनेनुसार ऑनलाईन पद्धतीने उन्हाळी सत्रातील परीक्षा घेण्यात आल्या. योग्य नियोजनामुळे ७३९ परीक्षांचे निकाल वेळेत ३० दिवसांमध्ये जाहीर केले.

- गजानन पळसे, प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

लोकमत

# दिव्यांग दिनानिमित्त आज कार्यक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे आज, शुक्रवारी दुपारी तीन वाजता जागतिक दिव्यांग दिनाचा ऑनलाईन कार्यक्रम होणार आहे. त्यात पुणे येथील निवांत अंध मुक्त विकासालयाच्या संस्थापिका मीरा बडवे मार्गदर्शन करणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील, अशी माहिती युजीसी स्किम फॉर फर्सन्स विथ डिसॅबिलिटीजच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठात आज जागतिक दिव्यांग दिनानिमित्त ऑनलाईन कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, यूजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसअबलिटीज, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त (३ डिसेंबर) रोजी दुपारी ३ वाजता ऑनलाईन कार्यक्रम होणार आहे.

पुणे येथील निवांत अंध मुक्त निवासालयाच्या संस्थापिका मीरा बडवे प्रमुख पाहुण्या असणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के असतील. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, लेखिका सोनाली नवांगुळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

0 3 DEC 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वातावरणातील कमी दाबाच्या पट्ट्यामुळे कोल्हापुरात मुसळधार पाऊस

## शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभाग व क्लायमेट चेंज सेंटर विभागप्रमुखांचे मत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गेल्या काही वर्षांत अरबी समुद्र व बंगालच्या उपसागरावर वादळांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे कमी दाबाचा पट्टा निर्माण होऊन कोल्हापूरसह राज्याच्या विविध भागांत डिसेंबरमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे, असे मत शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, सेंटर फॉर क्लायमेट चेंजचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी व्यक्त केले.

साधारणपणे जून महिन्यात महाराष्ट्रात पावसाळा सुरू होतो. ऑक्टोबर महिन्यानंतर परतीचा पाऊस सुरू होतो. तामिळनाडू व आंध्र प्रदेश राज्यात परतीचा पाऊस मोठ्या प्रमाणात पडतो. महाराष्ट्रात हलक्या स्वरूपाचा पाऊस पडतो. परंतु, गेल्या दोन वर्षांत हवामानात बदल झाला आहे. लॉकडाऊन काळात पोषक वातावरण निर्माण झाले होते. मात्र, अनलॉक केल्यानंतर सर्व उद्योग, व्यवसाय पूर्ण क्षमतेने सुरू झाले आहेत. याचा परिणामही जाणवू लागला आहे. समुद्रावर वारंवार कमी दाबाचा पट्टा निर्माण होत आहे. पाण्याचे बाष्पीभवन वाढले आहे. हिवाळ्यातील सरासरी तापमानात वाढ झाली आहे. परिणामी, कोल्हापूरसह राज्यात विविध ठिकाणी मुसळधार पाऊस पडत असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.

पुण्यनगरी

# एम.फिल, पीएच.डी.च्या शोधप्रबंधास ६ महिने मुदतवाढ

**नवी दिल्ली :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) एम.फिल व पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना शोध प्रबंध (थीसिस) सादर करण्यासाठी सहा महिन्यांचा वेळ वाढवून दिला आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना पुढच्या वर्षी ३० जूनपर्यंत आपले शोध प्रबंध सादर करण्याची मुभा असेल. संशोधक विद्यार्थ्यांचे व्यापक हित लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती यूजीसीचे सचिव रजनीश जैन यांनी दिली. आयोगाने ३१ डिसेंबरनंतर विद्यार्थ्यांना शोध प्रबंध जमा करण्यासाठी आणखी सहा महिन्यांचा वेळ दिला आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. यासोबतच दोन सत्रात शोध निबंध (रिसर्च पेपर) सादर करण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे.